## Concession and Scholarship : Information 2008-09
## (Common to All Students - U.G.)

# विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्तीचा प्रकार

अ) वरिष्ठ महाविद्यालयातील जे विद्यार्थी /विद्यार्थीनी (OBC/SC/SBC/VJNT/ST) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या, जमाती व विशेष मागास प्रवर्गामध्ये मोडतात. ते भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत.

ब) शिष्यवृत्ती अर्जाला जोडावयाचे आवश्यक कागद-पत्रे : शिष्यवृती अर्ज भरण्याची अंतिम कालावधी जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या आंत शिष्यवृत्ती अर्ज भरणे आवश्यक आहे.शिष्यवृती अर्ज हा स्वत: विद्यार्थाला ऑनलाईन भरावा लागेल.

१) एक नुकताच काढलेला पासपोर्ट फोटो शिष्यवृत्ती अर्जाला लावावा.

२) •मार्कलिस्टची झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी.

३) टी.सी. झेरॉक्स पत्र प्रमाणित केलेली जोडावी.

४) जातीचे प्रमाणपत्राची (Caste Certificate/Validity) झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी

५) उत्पन्नाचा दाखला हा तहसिलदार यांचा किंवा वडील नौकरी करित असतील तर त्यांचे वेतनाचे प्रमाणपत्र जोडावे. शासनाने विद्यार्थ्यांस /विद्यार्थीनीस शिष्यवृत्ती मिळण्याकरीता उत्पन्नाची मर्यादा:ओबीसी/एस.बी./सी./व्ही.जे.एन. टी. या कॅटेगरीमधील उत्पन्नाची मर्यादा रूपये १,००,०००/- एक लाख एवढी दिली आहे. आणि अनुसूचित जमाति (Scgeduled Casted/Scheduled Tribes) यांना उत्पन्नाची मर्यादा : रूपये १००,०००/- एक लाख एवढी दिली आहे.

६) विद्यार्थी मागील वर्षी कोणत्याही वर्गात व कोणत्याही महाविद्यालयामध्ये प्रवेशित होता. त्या सत्रातील शिष्यवृत्ती घेतली असल्यास आदेश क्रमांक व दिनांक त्या कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्याचे सही नीशीचे प्रमाणपत्र जोडावे किंवा दोन्ही पैकी एकही शिष्यवृत्ती किंवा सवलत घेतली नसेल तर शिष्यवृतीत न घेतल्याचे प्रमाणपत्र अर्जाला जोडावे. विद्यार्थी / विद्यार्थीनीहा दुसऱ्या जिल्हा मधुन आला असेल तर त्यांनी त्या जिल्ह्याचे जिल्हाबदली प्रमाणपत्र जर शिष्यवृत्ती घेतली असेल तर त्या जिल्हाच्या मा. समाज कल्याण कार्यालयामधुन आणावे आणि इबीसी सवलत घेतली असेतलतर मा. शिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडावे. आधार कार्ड क्र. अनिवार्य आहे. नाहीतर शिष्यवृती मंजुर होणार नाही. तसेच बॅक खाते क्र. देणे अनिवार्य आहे.

(७) जे विद्यार्थी/ विद्यार्थीनी वसतीगृहात राहत असतील त्यांनी वसतीगृहाचे प्रमाणपत्र शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

क) विद्यार्थ्यांनी/विद्यार्थीनींनी शिष्यवृत्तीचा अंतिम हप्ता नेण्याआधी आपली उपस्थिती ही ७५ टक्के आहे. किंवा नाही यांचे प्रमाणपत्र विद्यार्थ्याने / विद्यार्थीनींने संबंधीत वर्ग शिक्षक/ प्राध्यापक यांची स्वाक्षरी घेतल्या नंतरच शिष्यवृत्ती देण्यात येईल. शिष्यवृत्ती घेतलेवळी स्वत:चे ओळखपत्र असणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती घेण्यासाठी महाविद्यालयात त्यावर्षातील उपस्थिती ही ७५ टक्के असने आवश्यक आहे. जर ७५ टक्के पेक्षा कमी उपस्थिती असेल तर तो विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र राहणार नाहीत.

ड) विद्यार्थ्यांनी/विद्यार्थीनींनी शिष्यवृत्ती अर्ज कार्यालयात सुचनेप्रमाणे दिलेल्या मुदतीच्या आतच जमा करावा. अर्ज मुदतीत न आल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

२. **अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना**
सन २००७-२००८ या वर्षापासुन सुरू झाली आहे. शासन निर्णय: सासं. /उशि/अनु-३/०८/५३८ दिनांक १६-२-०८ (शासन निर्णय-महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २००७ (५४) तांशि १, मंत्राजय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ दिनांक २१ जाने. २००९ शासन निर्णय राज्यातील मुस्लिम, पारशी शीख, ख्रिश्चन आणि बौध्द समाजातीज गुणवत्ताधारक विद्यार्थाना केंद्र शासनाची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासून लागू करण्यात येत आहे. लाभार्थी पात्रता - १) इयत्ता ११ वी ते पी.एच.डी. २) मागील परिक्षेत ५० टक्के पेक्षा जास्त गुण आणि पालकाचे आर्थिक उत्पन्न रू. २:०० लाखापेक्षा कमी असावे. ३) या शिष्यवृत्ती योजनेतील लाभार्थीची संख्या मर्यादित स्वरूपाची असून दारिद्र रेषेखाली असलेल्या कुटुंबातील ज्या कुटूंबाच्या वार्षिक उत्पन्नाची रक्कम सर्वात कमी आहे.
त्यासाठी आवश्यक कागदपत्र - १) अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती अर्ज २ प्रतीत (ओरिजनल /झेरॉक्स) २) उत्पन्नाचा दाखला हा तहसिलदार यांचा किंवा नौकरी असतील तर त्यांचे वेतनाचे प्रमाणपत्र जोडावे. जर वडिल ह्यात नसतील वडीलाचे ह्यात नसल्याचे प्रमाणपत्र द्यावे. शासनाने विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळण्याकरीता उत्पन्नाची मर्यादा : रूपये २ लाख, ३) एक नुकताच काढलेला फोटो शिष्यवृत्ती अर्जाला लावावा. ४) मार्कलिस्ट झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी. ५) टी.सी. झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी. ७) प्रवेश घेतलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत जोडावी. ८) आधार कार्ड झेरॉक्स् लावावी.



३. **राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती**
शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची अंतिम कालावधी जून ते जुलै या दोन महिन्याच्या आत शिष्यवृत्ती अर्ज भरणे आवश्यक आहे. इयत्ता १२ वी मध्ये ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उतीर्ण झालेल्या कला व विज्ञान शाखेत प्रवेशित असणाऱ्यां विद्यार्थ्यांना लाभ घेता येईल. १) शिष्यवृत्ती अर्ज कार्यालयामधून द्यावा २) मार्कलिस्ट झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी. ३) टी.सी. झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी टिप : इतर कुठलाही शिष्यवृत्ती मंजूर झालेली असल्यास या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू नये.

४) **विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती :**
- टिप कुठलीही शिष्यवृती मंजूर झालेली असल्यास या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू नये ह्या शिष्यवृत्तीचा अर्ज पदवी शिक्षणाच्या किंवा पदव्युत्तर शिक्षणाच्या प्रथम वर्षात भरता येतो. परंतू त्याकरिता एच.एस.सी. किंवा पदवी परिक्षेत किमान ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडावयाचे आवश्यक कागद पत्र
१) विद्यार्थ्याने पात्रता परिक्षा ५० गुण घेऊन उतीर्ण केलेली असावी.
२) मागील वर्षाची गुणपत्रिका झेरॉक्स् प्रत प्रमाणित केलेली.
३) उत्पन्नाची मर्यादा रू. ४८०००/- (उत्पन्नाचा दाखला नायब तहसिलदार/ कार्यकारी दंडाधिकारी यांनी प्रमाणित केलेला)
४) जन्मतारखेचा दाखला
५) एन.एस.एस. सी.सी. सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी तद्संबंधीत प्रमाणपत्र इत्यादी माहिती सोबत जोडावी.

५) **अपंग शिष्यवृत्ती**
अपंग शिष्यवुत्तीला लागणारे आवश्यक कागदपत्रे : १) गुणपत्रिकची झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली २) डॉक्टरांचे अपंग असल्याचे प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी ३) टी.सी. झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी.

६) **कै. प्रा.के.जी. पाटील. शिष्यवृत्ती (पारितोषिक)**
अमरावती विद्यापीठाने घेतलेल्या बी. एस. सी. भाग -१ बी.एस.सी. भाग -२ बी. एस. सी.भाग ३, वार्षिक परिक्षेत पहिल्या प्रयत्नात सर्व विषयात सर्वप्रथम येईल. अशा विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी शिष्यवृत्ती पात्र आहेत.

## ७) भारत सरकार फिशिप सवलत

शासन निर्णय क्र. इमाव/२००२/प्रक४१४/मावक -३ दिनांक २९ मे २००३ नुसार १) वरिष्ठ महाविद्यालयातील जे विद्यार्थी अनूसूचित जाती.....अनुसूचित जमाती विमुक्त जाती........भटक्या जमाती.........व विशेष मागासप्रवर्गाचे आहेत परंतू त्यांचे उत्पन्न भारत सरकार शिष्यवृत्ती मध्ये बसत नसल्यास फ्रीशीप अर्ज करावा. २)तसेच इतर मागासवर्गीय विद्यार्थांचे उत्पन्न जर भारत सरकार शिष्यवृत्ती मध्ये नसेल त्यांनी फ्रिशीपचा अर्ज भरावा. ३) फीशीप अर्ज हा ऑनलाईन भरावा, अर्ज दोन प्रतीमध्ये भरून द्यावा. ४) मार्कलिस्ट झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी. ५) टी.सी. झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी. ६) जातीचे प्रमाणपत्राची (Cast Certificate Validilty) झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी. ७) नॉन क्रिमिलीयर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. इतर मागासर्वीय विद्यार्थीकरीता.

## ८) ई.बी.सी. सवलत

वरिष्ठ महाविद्यालयातील आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही सवलत लागू आहे. शासन निर्णय क्र. एफईडी./१०९६/प्र.१९७८/९६/साशि.५ दिनांक १३ जून १९९६ नुसार वरील योजनेचा तसेच उत्पन्न दाखला हा शहरी विद्यार्थ्यांकरीता तहसिलदार आणि ग्रामिण विद्यार्थ्यांकरिता सरपंच यांनी दिलेल्या असावा सोबत राशन कार्यच्या छायाप्रती दोन प्रतिमध्ये जोडणे आवश्यक आहे. १) ई.बी.सी. सवलत अर्ज बाहेरुन बुक स्टॉल मधून विकत घेवून दोन प्रति मध्ये भरून द्यावेत. २) मार्कलिस्ट प्रत प्रमाणित केलेली जोडावी. ३) टी.सी. झेराक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी. ४) तहसिलदार किंवा सरपंच यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडावे. उत्पन्न मर्यादा १५,००००/- आत उत्पन्नाचा दाखला जोडावा.

## ९) पी.टी.सी. सवलत

शासन निर्णय क्र. एफईडी /१०९६/प्र १९७८/९६,साशि ५ दिनांक १३ जून १९९६ वरिष्ठ महाविद्यालयातील प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना ही सवलत लागू आहे. वरिल योजनेचे लाभ फक्त तीन (३) अपत्यापर्यंतच देण्यात येतो. विद्यार्थ्यांचे पालक जि.प. मध्ये नौकरीत असल्यास अर्जावर शिक्षणाधिकारी यांची सही खाजगी किंवा सरकारी शाळेमध्ये नौकरीवर असल्यास सक्षम अधिकाऱ्याची सही असणे आवश्यक आहे. तसेच राशन कार्डाची छायाप्रत दोन प्रतिमध्ये जोडणे आवश्यक आहे. १) पी.टी.सी. सवलत अर्ज बाहेरुन बुक स्टॉल मधून विकत घेवून दोन प्रति मध्ये भरून द्यावेत. २) मार्कलिस्ट झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी.



## १०) एस.टी.सी.

शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र. एफ आय पी एफ /१०६९ /८५१२/सी दिनां ८ फेब्रवारी १९६८ अन्वये दिनांक १५ ऑगष्ट १९६८ नंतर जन्मलेल्या (४) चौथ्या व त्यानंतरच्या अपत्यास (मुलीसहीत वरील सवलती देय नाही.) वरिष्ठ महाविद्यालयातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच पाल्यांना ही सवलत देय आहे. शासन निर्णय दिनांक १९-०८-१९८५ नुसार त्यांचे कुटुंबातील फक्त दोन (२) अपत्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. विद्यार्थ्याचे पालक जि.प. मध्येनोकरीत असल्यास अर्जावर शिक्षणाधिकारी सही असणे आवश्यक आहे. तसेच राशन कार्डाची छायाप्रत दोन प्रतिमध्ये जोडणे आवश्यक आहे. १) एस.टी.सी. सवलत अर्ज बाहेरुन बुक स्टॉल मधून विकत घेवून दोन प्रतिमध्ये भरून द्यावेत. २) मार्कलिस्ट झेरॉक्स प्रत प्रमाणित केलेली जोडावी. ३) टी.सी. झेरॉक्स प्रत प्रमाणिक केलेली जोडावी. ४) शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र एफआयपीस/१०६९/८५१२/सी दिनांक ८ फेब्रुवारी १९६८ नंतर जन्मलेल्या (४) चौथ्या व त्यानंतरच्या अपत्यास (मुलीसहीत) वरील सवलती देय नाही.